श्री. राजाराम बाळाजी पाटील

— यांची —

# ❋ यशोलोचना ❋

●

-- लेखक --

पुरुषोत्तम पांडुरंग गोखले

कराड (जि. सांगली)

सज्जनहो,

" लोकी संसार करावा । नाना यत्ने आटोपावा ।
लोकामध्ये मिरवावा । पुरुषार्थ आपुला ।। "

सन्त रामदासांच्या या उपदेशाप्रमाणें आपले जीवन कारणी लावणारे महा-भाग धुंडाळावयास गेले तर सांपडत नाहीत, असे नाही. संसारातही अद्भूत आणि रम्य असतातच, पण पहाणारा मात्र लागतो. म्हणून मार्मिक दृष्टीने आपल्याच भोवती आपण पाहू लागलो तर, —

" करील व्याप तो भला । बहुत भाग्य लाभला ।।
करील कार्य तो भला । बहुचकीत एकला ।।"


अशी कर्ती माणसे खेड्यातही आढळतात.

" शुद्ध क्रिया ते प्रमाण । नसतां सर्वही अप्रमाण ।।
जैसे युद्ध केलियाविण । शूरता नाही ।।"

अशा वृत्तीच्या महाभागात उपाळे ( मायणीचे ) श्री. राजाराम बाळाजी पाटील यांची गणना करावी लागेल. ही पहा त्यांच्या कार्याची यशोलोचना –

– पु. पां. गोखले, कऱ्हाड.

# श्री. राजाराम बाळाजी पाटील



**चेअरमन**

दि खानापूर तालुका शेतकरी सहकारी खरेदी विक्री संघ लि; विटा.

# श्री. राजाराम बाळाजी पाटील

## ( चरीत्र व कामगिरी )

-●-

'हिंदुस्थान' हा खेड्यांचा देश. देह आणि देव यांच्यामध्ये देश आहे, हे विसरू नका, हा लोकमान्य टिळकांचा आदेश पाळावयाचा सुशिक्षितांनी सेवा-योगाने खेडी सुधारली पाहिजेत, हे हिंदुस्थानात निर्विवाद आहे. "खेड्याकडे परत वळा" असाच महात्मा गांधीनीही सुशिक्षिताना उपदेश केला होता. खेड्यांची सेवा करणें हे जसे सुशिक्षितांचे कर्तव्य तसेच ते खेड्यातील मूळ गांव-कऱ्यापैकी जाणकारांचेही कर्तव्य ही जागरूकता दक्षिण महाराष्ट्रातील ज्या महाशयांनी दाखविली त्यांत उपाळे (मायणी) चे दे. भ. **राजाराम बाळाजी पाटील** यांची गणना प्रामुख्याने कोणी केली तरी ते स्नेहांकित हृदयांस साजेसेच होईल.

केसरीकंदनाच्या (१९१४–१८ पहिले महायुध्द) प्रारंभघंटिका घणघणू लागल्या होत्या, लोकमान्य टिळक मंडालेहून अजून सुटून आले नव्हते; इंग्रज सरकारच्या दडपशाहीनें दबलेली भारतीय जनता आपले डोके वर कसे काढावे याच्या फिकिरीत होता; महाराष्ट्रात प्लेग आपला धुमाकूळ आवरत आला होता बँका बुडत होत्या आणि दुष्काळाची वक्रदृष्टी फिरू पहात होती. अशा त्या १९१३ साली उपाळे येथील सोळा आणे (मुलकी व पोलिसी) पाटलकीचे वतन असलेल्या घराण्यांत बाळाजींच्या पोटी जन्माला एक मुलगा आला, त्याचे नांव **राजाराम**. प्रभु रामचंद्रानी लंकाधिपति रावणाचा पराभव करून आल्यावर, धनुष्यबाण खांद्यावेगळे करून, हाती कमलपुष्पे घेऊन शान्तिवैभवाचे राज्य आता चालावयाचे अशी ग्वाही सूर्यरथातून अयोध्यानगरीत प्रवेश करतांना दिली होती. तसेच ब्रिटीश रियासतीच्या कचाट्यांतून सुटून झाल्यावर व सुट पहातानाही आपल्या बाळाने कार्य करीत रहावे, असाच हेतु आपल्या बाळाचे "**राजाराम**" हे नांव ठेवताना बाळाजीं पाटलानी धरला असेलही !

बाळाजी पाटलाना दोन मुलगे व दोन मुली. माधवराव, राजारामबापू व आक्कुबाई व सखुबा ही त्या भावंडांची नांवे. राजारामबापूंच्या नेणतेपणातच

त्यांच्या मातोश्री त्याना सोडून देवाघरी गेल्याने, त्या पोरकेपणांत त्यांच्या वडिलांनी व आत्याबाईनी त्यांचे संगोपन केले. राजारामबापूंचे शिक्षण सहाव्या इयत्तेपर्यंत झाल्यावर १९३१ साली त्यांना " चतुर्भूज " करण्यात येऊन संसाराचा ' आणा ' त्यांच्यामागे लावण्यांत आला. वडीलधाऱ्यानी ती जबाबदारी ज्यांच्यावर टाकली, त्या कडेगांवच्या श्री. सीताराम दौलतराव देशमुखांच्या कन्या (सौ) लिलावती होत. त्या चार इयत्ता शिकलेल्या होत्या.

राजारामबापूंच्यावर आतां संसाराची जबाबदारी पूर्णपणें सोपवावयास हरकत नाही असा विचार करूनच की काय १९३२ साली म्हणजे राजारामबापू आपल्या " हयाच्यात " आल्यावर त्यांच्या वडिलानी स्वतःच्या वारकरी सांप्रदायास अनुसरून विठ्ठलचरणीं " सर्वभावे विलीनता " पतकरली. मग दोन वर्षे, आईसारखे संगोपन करणाऱ्या मावळणीने राजारामबापूंचे घर नीट चाललेले पाहिले नि समाधानानें शेवटचा श्वास १९३४ साली सोडून ती आपल्या भावासारख्याच देवाचरणीं गेली. आता वडीलबंधु माधवराव हेच काय ते आधारास होते त्यांनी सरकारकडून मुलकी पोलीस पाटिलकी बापूकडे येण्याची खटपट केली व तीही जबाबदारी १९३६ पासून राजारामबापूना सांभाळावी लागली. अशा प्रकारे कुलपरंपरेच्या सर्वच जबाबदारीसह कर्तव्याकडे लक्ष देणें राजारामबापूकडे आले.

ब्रिटिश राजवटीच्या जुलूमशाहीची यंत्रणा हाताळतांना प्रजेवर अन्याय कसा होतो याचा अनुभव राजारामबापूना हळूहळू पण निश्चयानें येऊ लागला. तो या वारकरी गृहव्यवस्थेंत वाढलेल्या पंचवीशीच्या तरुणाला रुचून कोठून होणार ? " जे कां रंजले गांजले, त्यासि म्हणे जो आपुले " असा साधु होणे जमेल तेव्हां जमेल, पण ' नाठाळाचे माथा काठी ' घालून गोरगरीबावरील अन्याय दूर करण्यासाठी आपण झटलेच पाहिजे, असे राजारामबापूना वाटू लागले. त्यापेक्षाही ' कायदा आणि सुव्यवस्था ' यांच्यावर आधारलेली आपली राज्यपध्दति आहे, असा गर्व वाहणाऱ्या इंग्रजांच्या इज्जतीची परीक्षा तरी पहावयास हरकत नाही, असे त्यांच्या मनाने घेतले आणि तशी पावले टाकावयास सुरवात केली.

राजारामबापूना अन्याय खपत नाही, असें लक्षात आल्यावर, सगळ्यानाच त्यांच्याविषयी आपुलकी वाटू लागली. मग एका देशाचे दुसऱ्या देशावर कायदेशीर लुटीचे राज्य चालावे, हा सर्वात मोठा अन्याय मानणारे राजकीय पक्षही बापूशी जवळीक करू लागले. त्यांत देखील काँग्रेस पक्षीयांना राजारामबापूंसारखा सार्थी मिळाला तर ब्रिटीश सत्तेला खेड्यापाड्यातून नेटका शह द्यावयास खास अवसर सांपडेल असा भरवंसा वाटू लागला.

त्यामुळें कांही कांहीं वेळेला प्रसंग बाका उद्भवे आणि कादंबरीपेक्षाही अद्‌भूत घटना घडत. पाटील म्हणून एका बाजूनें सरकारी अधिकारी घरी पाहुणे यावयाचे, तर त्याच दिवशी काँग्रेसचे व सार्वजनिक कार्यकर्ते राजारामबापूंच्या जिव्हाळ्यानें त्यांच्याच घरीं तळ देऊन राहिलेले सांपडावयाचे. आणि तरीसुद्धा लोकसंग्रही बापू ती अतिथिसत्काराची "तारेवरील सर्कस" अशा शिताफीनें चालवित कीं, "आश्चर्यवत्पश्यति कश्चिदेनमाश्चर्यवद्वदति तथैवचान्यः।" असे दृश्य निरीक्षकांना दिसे. अन्यायाच्या प्रतिकाराचें कार्यात आणि देशस्वातंत्र्याच्या चळवळीचे प्रगतीत, कोठेही कसूर राहु देऊ नये, ही काळजी त्याप्रसंगी राजाराम बापू ज्या धीमेपणानें वहात, त्या धीमेपणाला लोकजिव्हाळ्याची आणि गांवाच्या सहकाराची साक्ष नसती तर काय झाले असते ? याचा विचार जेव्हा मेंदुपुढें येतो तेव्हां राजारामबापूनी "भला रे भला बोलती ते करावे।" या समर्थ वचनाला कसे आचारशुद्ध राखले असेल, याची बरोबर कल्पना देईल.

उपाळे हा गांव सात्विक व समन्वयी मनोवृत्तीच्या ईतिहासाचा आहे. ज्ञानेश्वरी, तुकारामाची गाथा, रुक्मिणीस्वयंवर अशी ग्रंथ संपदा स्वताचे हस्ताक्षरात राजारामबापूंच्या आजोबानी बिनचूक लिहून ठेवले हीच वरील गोष्टीची ग्वाही होय. ज्ञानेश्वरीचे पाठ करणारे कोल्हेश्वरीनें लोकास सपाट करावयास कमी करीत नाहीत, हा जागतिक अनुभवापैकी एक किस्सा लक्षांत बाळगूनसुद्धा, राजारामबापू हे 'भाऊपाटलाचे उपाळे' म्हटले गेलेल्या गावचे आहेत आणि हे 'भाऊ पाटील' म्हणजे राजारामबापूंचे आजोबा याची जाणीव व्हावयाचा अवकाश की "सत्ता म्हणजे सत्ता अर्थात चांगुलपणा मूर्तिमंत चालविणाऱ्या भाऊ पाटलांच्या परंपरेला आणि आदराभिमाने चालविण्याचा अखंड नेम धरणाऱ्या गावस्वरुपाला धन्यवाद द्यावे, असेच कोणाही विचारवंतास वाटेल. आजोबांचा कित्ता गिरवून बापू चाल-

त्यामुळें आजकालचे उपाळे हे बापूंचे उपाळे असेच लोकामुखी ऐकू येत नाही काय? नाटकाच्या दिग्दर्शकाप्रमाणेंच पडद्याआडून काम करीत असले तरी " मुख्य सूत्र हाती घ्यावे । करणें ते लोकाकरवी करवावे ।। " हा त्यांचा शिरस्ता १९३७ साली चांगलाच प्रत्ययास आला १९३५ च्या सुधारणा कायद्यान्वये कॉंग्रेसने निवडणूका लढवून उघडया मैदानाप्रमाणेंच विधानसभांच्या चौखांबीतही स्वराज्याची आघाडी उघडावयाची, असे कॉंग्रेसने ठरविले व सातारा जिल्ह्याच्या दक्षिण भागा तर्फे बोरगांवकर आत्माराम पाटील, कऱ्हाडचे पांडुआण्णा शिराळकर, आणि भाऊ-साहेब कुदळे हे आपले उमेदवार कॉंग्रेसने जाहींर केले. त्यांच्या उमेदवारीचा प्रचार राजारामबापूनी उमद्या धिटाईने केला आणि उपाळे येथे मतदानकेंद्रही मिळविले परिणामत: भोवतालच्या चौदा गांवातील मतदारानी स्वताच्या बैलगाडया जोडून उपाळे केंद्रावरील मतदान पहिल्या प्रतिष्ठेचे केले. खानदानी घराण्यातील स्त्रिया त्यावेळी मतदानासाठी जाहीर रित्या उपाळयास आल्या ही एकच गोष्ट राजाराम बापूंच्या क्रियाशीलतेची निशाणी म्हणून तेव्हांपासून लोकस्मृतीत ठसलेली आहे. तेव्हापासून राजारामबापू कॉंग्रेसचे निष्ठावंत पाईक म्हणून लोकपरिचयाचे झाले आणि त्यांचा तो लौकिक आजपर्यंत सातत्याने कायमच आहे. ब्रिटीश सरकारने हे सर्व कसे सहन केले म्हणाल तर बापूंच्या गनिमी काव्याने " आग झाली तरी बोंब मारण्याची सोय नाही " अशी इंग्रजी राजवटीची स्थिति होत असे वानगी म्हणून या बाबत औंधसंस्थानातील बेलवडे गांवी शाहीर निकम यांचे पोवाडे कॉंग्रस प्रचाराकरिता झाले, त्याचे उदाहरण सांगता येईल त्याकार्यक्रमाचो व्यवस्था त्याचा सर्व खर्च, त्याला प्रेक्षकांची आलोट गर्दी हे सर्व राजारामबापूंचे निर्माण होते. उपाळयात स्वता राहून दीड मैलावरील हा सर्व उभा धरण्याने " दास दूर दूर राहतो । प्रगति देशाची पाहतो । या समर्थसांगीचे प्रात्यक्षिकच निष्काम कर्मयोगी राजारामबापूनी दाखविले होते. यापुढील १९४६, १९५२, १९५७, १९६२ व १९६७ सालच्या निवडणूकीतूनही राजारामबापूना उमेदवारीचे कॉंग्रेस-तिकीट मिळावे म्हणून खटपटी झाल्या पण त्या खटपटी खटनटानी लटपटवून टाकल्या; तरीही राजारामबापूची कॉंग्रेसनिष्ठा आणि सेवायोग यानी आपल्या कर्तव्यनिष्टेत बिलकूल कसूर केली नाही. " खरा तो प्रेमा ना धरी लोभ मनी ।। "

राजारामबापूनी या कॉंग्रेस सेवेपेक्षाही सहकारी वगैरे क्षेत्रात व्यापक लोक-सेवा केली आहे. आणि तरीही त्यानी त्यासाठी आपल्या प्रपंच्यावर पाणी न सोडता तो नेटकेपणानें केला आहे. त्यांचे थोरले चिरंजीव पदवीधर (ग्रॅज्युएट) असून

सर्वात धाकटे चिरंजीव पुण्यास बी. एस. सी. (अॅग्रिकल्चरल) चा शिक्षणक्रम पुरा करीत आहेत. मधले दोन मुलगे मराठी सातवी करून घरची शेती किफायतशीरपणें करीत आहेत शेवटच्या चिरंजीवानी आपल्या शास्त्रशुध्द शेतकीज्ञानाची त्याना साथ दिली की औद्योगिक स्वरुपाची सहकारी शेती राजारामबापूंच्या घरी अवतरल्याचे उदाहरण लोकांपुढे राहील.

" प्रपंच साधुनि परमार्थाचा लाभ जयाने केला। तो नर भला भला भला।" असे एक संत वचन आहे. त्यादृष्टीने राजाराम बाळाजी उपाळेकर पाटील यांच्या पंचावन्नीतील कामगिरीचे सिंहावलोकन केले, तर काय उद्‌बोधन होते तेही पाहणें रम्य आहे. उपाळें-मायणी विविध कार्यकारी सहकारी सोसायटीचे चेअरमन म्हणून १९३६ ते १९६३ अशी सत्तावीस वर्षे बापू काम पहात होते. एवढी एक गोष्ट त्यांच्या लोकप्रियतेची साक्ष देण्यास पुरेशी नाही काय ?

राजारामबापूंची ही लोकप्रियता त्यांच्या सेवाभावाने त्यांना मिळवून दिली आहे. " शुध्द करा रे अवघे मन। जनी जनार्दन देखा रे।। " असा तो त्यांचा भाव लोक अन्नस्वावलंबी झाले पाहिजेत स्वराज्याचे हे पहिले ठाण. त्यासाठीं शेतकऱ्यास आपले उत्पन्नात व उत्पादन वाढविण्यास उत्तेजन यावे म्हणून तसा विक्रम करणाऱ्या शेतकऱ्यास बक्षीस देणेंची प्रथा राजारामबापूनी सुरु केली. अन्नाबरोबरच वस्त्रस्वावलंबनाचा प्रश्न सुटला पाहिजे म्हणून महात्मा गांधीनी सूत-कताई आणि खादी यांचा उपाय सांगितला, त्याचाही अवलंब बापूनी केला. पण गावची मुख्य गरज म्हणजे स्वराज्यातील स्वावलंबनाच्या दृष्टीने शहाण्या जनतेच्या बळकट पणाची. त्यासाठी शाळेची दुरुस्ती ४५०० रु. खर्चाने, समाजमंदिराची उभारणी ६००० रु. नी जशी बापूनी घडविली तशीच गावची तालीमही श्रमदानाने बांधून काढली. राष्ट्रातील खेडोपाडीची मुले ही मन, मेंदू, आणि मनगट यानी बळकट समाजसेवाभावी झाली पाहिजेत, हा या संस्था उभारण्यामागील हेतु होता त्यासाठी स्वतः पुढे होऊन " आधी केले, मग सांगितले " हे व्रत घ्यावे लागते. ते बापूनी घेतले आणि ? " एकमेका साह्य करूं अवघे धरू सुपंथ " असा पायंडा त्यांनी पाडला. श्रम असोत नाहीतर दाम असो त्याचे दान समाज सर्वोत्तमासाठीं करतांना ते ज्याच्या त्याच्या अक्कलहुशारीने आणि कुवतीने झाले पाहिजे, ही दक्षता नेत्यानें घ्यावी लागते. तीच बापूनी घेतली व म्हणून सगळयाना सारख्या न्यायबुद्धीनें मिळणाऱ्या वागणुकीतून सहकारी जीवन वरील संस्थांच्या रूपाने साकारलें.

समाजाचे स्वास्थ्य राहण्यास गांवस्वरुपी संरक्षणाचीही आवश्यकता असते. १९४२ च्या " चलेजाव " च्या आंदोलनांत सरकारी यंत्रणा मोडून पाडण्याचा उद्योग देशभक्त मंडळी करू लागतांच, कांही जातीवंत दरोडेखोरही स्वतःस देश–भक्त म्हणवू लागले व कांही खुद्द सरकारी यंत्रणेच्या प्रेरणेनेही स्वतःस तसे म्हणवू लागले. काँग्रेसच्या चळवळीला भ्रष्टविण्यासाठी परकीय सत्तेच्या या धड–पडीने समाजस्वास्थ्य संपुष्टात आले आणि १९४४ पर्यन्त जनसामान्याला सार्व–त्रिक अराजकाचे चटके बसू लागले. तेव्हां घरटी एकएक जवान मिळवून बापूनीं संघटना बांधली आणि पंचवीस पंचवीस माणसांनी गावाला आपापल्या पाळीप्रमाणे पहारा द्यावयाची शिस्त लावून दिली. पोलीस पाटील म्हणून अशी संघटना बांध–ताना, सरकारला त्यावर आक्षेप घेता येईना आणि सरकारी यंत्रणातून हत्यार, हुकूम वगैरे कशाचीही मागणी बापूनी न केल्यामुळें लोकांनाही गावस्वावलंबनाला त्यांत बाध वाटेना. " नृपतिजनपदानां दुर्लभः कार्यकर्ता " बापू ठरले आणि राजकीय दृष्टचा सरकारी यंत्रणा लोकाभिमुख झाल्याचे दृश्य स्वराज्याचे सुचिन्ह ठरले. १९४४ साली एका दरोडेखोरांच्या टोळीस गांवाने जो सामना दिला, त्यांत गांवचा एक बळी गेला व एकजण जबरदस्त जखमी झाला, हे खरे; पण " गांव करील ते राव काय करील ? " याचा लोकशाही प्रत्यय उपाळे गांवाने दिल्यामुळें सरकारी यंत्रणेने गांवचा व राजारामबापूंचाही गौरव करण्यास पुढे येऊन स्वतःची पत राखण्याचा प्रयत्न केला. पण गावसंरक्षणाचे एवढेच काम बापूनी केले नाही. खेड्यातील शेतकऱ्यानी स्वश्रमाने उभी केलेली पीकांची संपत्ति रानात उघड्यावर असते ती लुटून नेण्याची लाट एकवेळ आली असताही आपल्या संघटनेच्या जोरा-वर चंगीजखानी बापूनी जेथल्या तेथे जिरवली हेही बापूस भूषणास्पद ठरले आहे.

गांवातील जुन्या विहीरींच्या दुरुस्त्या, सुधारलेल्या खतपाण्याचा आणि बी बियाणाचा शेतकऱ्याना पुरवठा या शेतकरी जीवनाच्या आवश्यक सेवा आपल्या दैनंदीन जीवनात बापू जसे निष्ठेने करीत तशीच समाजातील कोणत्याही वर्गांवर कोणाकडूनही अन्याय घडू नये अशी दक्षता घेत. या संबंधात दुमालदारांच्या वसू–लाचे उदाहरण लक्षांत राहण्यासारखे आहे. उपाळे (मायणी) हा कोरेगांवच्या वोकीलांचा दुमाला गांव. दुमालदारीचे सामाजिक परिणाम लक्षात बाळगूनही, दुमालदारी जोपर्यंत नष्ट झाली नाही, तोपर्यंत तिची शिस्त पाळलीच पाहिजे आणि तीविरूध्द बंडच करावयाचे झाले तर ते सांगून सवरून शांततेच्या सत्यग्रहाने घड-विले पाहिजे. हे बापूना, महात्मागांधींच्या सत्याग्रहाने पटले होते. पण गांवकरी

सरकारी दंडुक्याला भिऊन सरकारी चावडी भरावयाचे आणि दुमालदाराला खुंटीवर ठेवावयाचे ! हा प्रकार बापूना वराच वाटला नाही. आणि म्हणून लोकांना विश्वासात घेऊन दुमालदारांची थकबाकी त्यांच्याकडून बापूनी भागविली व पुन्हा ती न करण्याबद्दल लोकांन वळण लावले. पण यापेक्षाही कितीतरी दिवसांचा एक जुनाट अन्याय बापूंचा हात लागून दूर होण्याची वाट पहात होता. अस्पृश्यता ! १९३७ सालापासूनच हरिजनांचे लग्नकार्यांत जातीने हजर राहून ती अस्पृश्यता मावळावयास बापूनी सुरवात केली. त्या मंडळीतील कांहीजण सराईत गुन्हेगार होतात याचे कारण त्याना " बेकारी " भोवते, असे आढळून आले. तेव्हां हरि-जनांच्या व अन्यही समाजांतील बेकारीचा छडा लावून, बापूनी ज्याला जेथें गुंतविता येईल तेथे त्याच्या पात्रतेप्रमाणें कामास गुंतविण्याची जणु मोहीमच सुरू केली आणि संभाव्य गुन्हेगारीचे पिशाच्च मुळांतच उखडून टाकण्याचा प्रयत्न केला

खेडी नव्याने बांधावयाची तर परस्पर दळणवळणाचे रस्ते हवेत आणि शहरी–खेड्यातील अंतर शक्य तितके सांस्कृतिक दृष्ट्याही कमी व्हावे, अशी योजना झाली पाहिजे त्यादृष्टीने पोहोंच रस्ते श्रमदानानेसुद्धां जसे बापूनी तयार केले, तसेच हिशोबी बिनचूकपणाचे वळणही गांवास लावले. दरसालात सार्वजनिक जमविलेल्या वर्गणीतून झालेल्या कामाचे ताळेबंद दरवर्षीच्या पाडव्यास चावडीवर लावून लोकांनीच लेखापरीक्षा करावी. व सार्वजनिक कामाचा निर्मळपणा पडताळावा असा शिरस्ता जो बापूनी पाडला, त्याचा क्वचितच कोठे तोड वा जोड असेल.

सन १९५६ पासून गांवात पहिले ऑईल इंजिन बापूंच्या खटपटीनें वसले. यावरून नव्या यंत्रयुगाच्या सुधारणा स्वीकारण्यास तो भाग तयार असल्याचे जसे सिध्द झाले, तसेच आपले सर्व आर्थिक व्यवहार सहकारी पध्दतीनें करावयास तो भाग सिध्द आहे. मात्र बापूंच्यासारखा नेता त्या क्षेत्रात हवा, हेही त्या भागातील सोळा सोसायटयांच्या युनियनचे अध्यक्ष बापूना चार वर्षे ओळीनें निवडून त्या भागाने पटवून दिले पुढें बापू सहकारी संस्थांचे सवटकच झाले आणि पाच वर्षांत गांवोगावी सहकारी संस्था उभारून त्यांनी सहकारी आर्थिक जीवनाचे जाळेच विणले.

संस्थानें विलीन झाल्यानंतर राज्यकारभाराच्या सोईचे दृष्टीने सांगली जिल्हा नव्याने उदयास आला. त्यांत खानापूर तालुक्याचा समावेश झाला. तरी त्याची

मार्केट कमिटी वाळवे तालुक्यातील ताकारीची मार्केट कमेटीच राहिली. त्या कमेटीवर राजारामबापू निवडून तर आलेच पण पुढे सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेवरही बापू डायरेक्टर म्हणून बिनविरोध निवडून आले. त्या बँकेच्या विटा शाखेचे कार्याध्यक्ष म्हणून त्यांनी पांचएक वर्षे लोकसेवा केली, तशी शाखा आटपाडीवरही साधे सभासद म्हणून सेवा केली. बँकेच्या वतीनें वारणा व्हॅली सहकारी खरेदी–विक्री संघाच्या कंट्रोल बोर्डावर, आटपाडी को–सुपरवायझिंग युनियनवर, बोरगांव युनियनवर, कुंडलच्या गूळ खांडसरी सहकारी सोसायटीवर, त्याचप्रमाणें विटे, नांगरी, कडेगांव वगैरे सोसायटीवरही जसे सभासद म्हणून बापू निवडून येऊन सेवा करीत राहिले तसेच खानापूर नवभारत सोसायटीतही सेवा करीत राहिले. तात्पर्य, सहकारी क्षेत्रांत " उणे पडो देऊ नये कोणी एकाचे " यासाठीं बापूनी आपला उपयोग करून दिला. त्यामुळेच सहकारी क्षेत्रांतील लवादाची कामें रजिस्ट्रारचे प्रतिनिधि म्हणून करण्याचा मान बापूना बिनचूक मिळाला आणि त्यांनी न्याय देणेंत एवढी दक्षता घेतली कीं, त्यांच्या निर्णयाविरूद्ध एकही अपील झाले नाही, विटा मर्चंट को–ऑपरेटिव्ह बँकेची कामे बापूच्या न्यायबुद्धीची साक्ष देण्यास समर्थ आहेत. मग खानापूर तालुका शेतकरी असोशिएशनचे सभासद म्हणून बापूनी केलेली सेवा शेतकऱ्यांच्या कल्याणाचीच झाली, हे काय उवडच सांगितले पाहिजे काय ?

खानापूर ता. सहकारी खरेदी विक्री संघाची स्थापना १९५८ साली ७५०० रु. प्राथमिक भांडवल जमवून राजारामबापूनी केली आणि १९५९ चे मे महिना अखेर ती रजिस्टर होऊन त्याचे अध्यक्ष बापू निवडून आले ते ३० जून १९६८ अखेर एकसारखेच. या अवधीत संघाचे भाग भांडवल ४०००० चाळीस हजार रुपये झाले, सरकारने एक लाख रुपये भांडवल घातले, विटे मार्केट यार्डात संघानें दोन प्लॉटस् खरेदून २८००० रुपयांचे गोडाऊन बांधले. याकामी सरकारनें १५००० रु कर्ज मदतहि दिली आहे. सांगलीच्या जिल्हा मार्केट यार्डातही संघाचे २ प्लॉट असून वारणा व्हॅली, कराड या संघाच्या बरोबरीनें विटे संघाचे व्यवहार हळूहळू येत आहेत. तेथेही संघाचे गोडाऊन होऊ घातले आहे. अशा या प्रथम–पासूनच्या उज्ज्वल व उत्कर्षकारक कामगिरीमुळें बापूंचे कार्याचे उदाहरण सतत डोळ्यापुढें रहावे या उद्देशाने संघानें बापूंचे चित्र संघाचे कचेरीत लावण्याचा कृतज्ञता पूर्वक ठरावही केला आहे त्याची पूर्तता समारंभाने होत आहे.

सांगली जिल्हा लोकल बोर्डाचे सभासद म्हणूनही बापूनी १९५२ ते १९५६ काम केले असून श्रीगणपती जिल्हा सहकारी खरेदी विक्री संघ सांगली चे १९६१ पासून डायरेक्टर व सध्या चेअरमन म्हणून बिनविरोध निवडून येऊन काम पहात आहेत. तसेच सांगली जिल्हा ग्रामोद्योग संघाचे सभासद, सांगली जिल्हा कॉंग्रेस कमेटीचे सभासद, सांगली जिल्हा औद्योगिक संघाचे सभासद या नात्यानें बापूनीं केलेली कामगिरी प्रशंसनीय असून औरंगाबाद येथील सहकारी परिषदेत ते सांगली जिल्ह्याचे प्रतिनिधि होते. महाराष्ट्रराज्य मार्केटिंग सोसायटी, पश्चिम महाराष्ट्र प्रादेशिक मंडळ (पुणें), सांगली शेतकरी सहकारी साखर कारखाना सांगली, जिल्हा सहकारी भूविकास बँक, ग्राऊंडनट प्रोसेस, को–ऑप. सोसायटी, बळवंत कॉलेज विटे इत्यादि लोकोपयोगी संस्थांच्या प्रस्थापनेत राजारामबापूनीं केवढी तरी सेवा सादरली आहे.

बापूंच्या सेवाकार्याची गंगा किती कार्यक्षेत्रांत आणि कशी विविध तऱ्हेनें वाहिली व तिने जनतेच्या सुखी जीवनाची समृद्धी कसकशी साधली, हे त्यांचे त्यांनाहीं तपशीलवार सांगता येणार नाही. त्याची नोंद जनतेच्या कृतज्ञतेतच, निरीक्षकांना सांपडेल, " देव भावाचा भुकेला " नसतो कां ?

सेवायोगी राजाराम बाळाजी उपळेकर पाटलास परमेश्वराने उदंड आयुरारोग्य कार्यक्षमतेचे द्यावे हीच त्यास बापूंच्या स्नेहांकितांची प्रार्थना !

आजकाल स्वतंत्र भारताची सकस बांधणी चालू असतां श्री राजारामबापू पाटलांच्या सारख्या कार्यकर्त्यांची खेड्यापाड्यातून नितान्त आवश्यकता आहे. राष्ट्राचा इतिहास त्यांच्यासारख्यांच्या परिश्रमातूनच नांवारूपास येतो.

।। न्याय, अन्याय जो जाणे । अन्याय न करी कदा ।।
।। नीति न्याये मिळो जाणं । तोचि तो लोकसंग्रही ।।

असे बापूंच्या सारखे लोकसेवक जेव्हां –

तनें मने झिजावे । तेणे भले म्हणोन घ्यावे ।।

असा आदर्श भावी पिढीपुढें आपल्या वर्तनानें ठेवतात, तेव्हांच राष्ट्रांत रसरशीत जिवंतपणा तग धरतो आणि बापापेक्षा मुलगा, गुरुपेक्षा शिष्य व पुढाऱ्या पेक्षां अनुयायीवर्ग सवाई कर्तबगारीचा निघून राष्ट्राचे तेज चढत्या वाढत्या पदवांनें जगाच्या सन्मानास पात्र होते.

.. पु. पां. गोखले, कऱ्हाड

मुद्रक – गोविंद जगन्नाथ हर्षे
श्रीगजानन प्रि. प्रेस, विटा (जि. सांगली).